सोमवार दि.१९ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३५०
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत  संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




Email : elokneta@gmail.com  Lokneta News - लोकनेता न्युज  8459977904  www. lokneta.com



# मी माझ्या ८० वर्षाच्या स्वाभिमानी वडिलांसोबत

## मी भावासोबत गेले असते तर केंद्रीय मंत्री असते–सुप्रिया सुळे

लोकनेता न्यूज नेटवर्क
जळगाव (वृत्तसंस्था)

महिलांना सत्तेपेक्षा स्वाभिमान जास्त महत्वाचा असतो, मी भावासोबत गेले असते तर केंद्रात मंत्री झाले असते. पण मी माझ्या ८० वर्षाच्या स्वाभिमानी वडिलांसोबत उभी राहिले याचा मला अभिमान आहे, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे यांनी केले आहे.
दरम्यान सुप्रिया सुळे म्हणाल्या की, एक देश एक निवडणुकीचा नारा देणारे सरकार महाराष्ट्रातील निवडणुका पुढे ढकलत आहे. याचा अर्थ सरकार डर रही है, कारण राज्यातील महायुतीचे नेते निष्क्रिय असल्यामुळेच प्रधानमंत्र्यांना महाराष्ट्रात यावे लागत आहे, असा खोचक टोला सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारला लगावला आहे.खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, दोन पक्ष फोडण्याचे देवेंद्र फडवणीस यांना कौतुक वाटत असेल तर ते दुर्दैवी आहे. मी पक्षाकडे खासदरकीचे तिकीट सोडून काहीही मागत नव्हते कारण संसदेत पहिला नंबर येत असल्यामुळे मी मेरिटवर खासदारकीचे तिकिट मागितले, तर तो गुन्हा आहे का?, असा सवाल सुळेंनी उपसथित केला आहे.सुप्रिया सुळे म्हणाल्या की,आपली सत्ता आल्यानंतर महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री पहिला निर्णय हा शेतकऱ्यांच्या हमीभावा संबंधीचा घेईल असे त्यांनी म्हटले आहे. आता पुढील ९० दिवस आपल्याला स्वाभिमानासाठी लढायचे आहे. देशातील जनता खोकेवाली नाही, तर इमानदार आणि प्रामाणिक आहे, हे त्यांनी लोकसभा निकालात दाखवून दिले आहे. तर मी कष्टाची परिकाष्टा करेन आणि सत्याच्या मार्गाने चालेन पण कधीही दिल्ली समोर मुजरा करणार नाही, असेही सुळेंनी म्हटले आहे.

### ठाकरे, पवारांचा घात केला

**सध्या न्यायालयात सुरु असलेली लढाई ही फक्त पक्ष आणि चिन्हाची नाही तर ती नैतिकतेची लढाई आहे. कारण पक्ष आणि चिन्ह ओरबाडून घेणे हा शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचा घात केला असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. तर आता अनेकजण माफी मागत आहेत, पण माफी मागणाऱ्यापेक्षा माफ करणारा हा मनाने मोठा असतो पण माफी मागणारे स्वत:ची चूक मान्य करत असतील ते कोर्टातील केस मागे घेणार का? असा सवालही खासदार सुळे यांनी उपस्थित केला आहे.**

# चैतन्य विद्यालयातील विद्यार्थीनींनी पाठवल्या सीमेवरील सैनिकांना राख्या

लोकनेता न्यूज नेटवर्क
ओतूर | मयूर ढोबळे

येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयातील पाचवी ते दहावीतील विद्यार्थीनींनी सीमेवर लढणाऱ्या जम्मू-काश्मीर लढाख भागामध्ये रक्षाबंधनानिमित्त खास कार्यानुभवाच्या तासाला बनवलेल्या राख्या पाठवल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.या उपक्रमाबद्दल अधिक माहिती देताना विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री भाऊसाहेब खाडे म्हणाले की, सीमा भागामध्ये देशाच्या रक्षणाकरता प्राणपणाने लढणाऱ्या सैनिकांबद्दल विद्यार्थ्यांमध्य प्रेमाची ,आदराची आणि आपुलकीची भावना असावी किंबहुना त्यांच्यामध्ये ती भावना निर्माण व्हावी आणि त्यांना देशासाठी लढणाऱ्या सैनिकांबद्दल अभिमान वाटावा ,यासाठी या रक्षाबंधनानिमित्त सीमाभागात असणाऱ्या सैनिकांकरता राख्या पाठवण्याचा एक वेगळा उपक्रम सैनिक हो तुमच्यासाठी असा राबवला गेला . त्यासाठी अजित डांगे, अनिल जवरे, दिनेश ताठे, संतोष सोनवणे, बाळासाहेब साबळे आदि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे या प्रकल्पाला प्रतिसाद दिला आणि आठ दिवसांमध्ये राख्या बनवून ओतुर पोस्ट कार्यालया मार्फत जम्मू काश्मीर-लडाख भागामध्ये रवाना केल्या. विद्यालयातील विद्यार्थिनींनी रक्षाबंधन निमित्त सैनिकांना शुभेच्छा पत्र संदेश पण याबरोबर पाठवले आहेत.
चैतन्य विद्यालय ही उत्तर पुणे जिल्ह्यातील एक मोठी शाळा असून नवनव्या उपक्रमांसाठी ही शाळा प्रसिद्ध आहे. या उपक्रमा साठी शरद माळवे, मंगेश तांबे, प्रमोद जाधव, राजाराम शिंदे,मिलिंद खेत्री, विशाल चौधरी, संतोष कांबळे, वनिता भोर, आसावरी गायकर,देवचंद नेहे, लक्ष्मण दुडे, अमित झरेकर, सोनाली माळवे, आशा गाडेकर,सोनाली कांबळे, आशा डुंबरे, अश्विनी नलावडे, सुजाता राऊत हर्षल शितोळे, तनुजा थोरात, प्रमिला डोंगरे, साक्षी देशमुख, सौरभ ढमाले, अनुराधा इसकांडे, विजय खरात, प्रसन्ना तांबे,मयूर जाधव, ईश्वर ढमाले, योगेश फापाळे, अरविंद आमरे, तेजस ढमाले, दीपक हांडे यांचे सुद्धा सहकार्य मिळाल्याचे श्री खाडे यांनी सांगितले. या अनोख्या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे, प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे, प्रदीप गाढवे, पंकज घोलप, संजय हिरे, अनिल उकिर्डे आणि परिसरातील लोकांनी कौतुक केले आहे.




## छावा संघटनेच्या वतीने

# मराठा आरक्षण व शेतकरी आत्महत्या केलेल्या बांधवानच्या घरी रक्षाबंधन साजरा



लोकनेता न्यूज नेटवर्क
नांदेड | बाजीराव गायकवाड

सामाजिक वारसा असलेली अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने नायगाव तालुक्यातील भोपाळा गडगा केदारवडगाव टाकळी बळेगाव येथील मराठा आरक्षणासाठी व शेतकरी आत्महत्या केलेल्या बांधवांच्या घरी जाऊन सामाजिक बांधिलकी कायम असावी ही बाब लक्ष्यात ठेऊन हा उपक्रम छावा संघटनेच्या वतीने राबवण्यात आला यावेळी छावाचे जिल्हा अध्यक्ष माधवराव ताटे पाटील तालुका अध्यक्ष प्रताप पाटील सोमठाणकर मराठा राष्ट्रीय महासंघ जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत पाटील होटाळकर संभाजी ब्रिगेड चे तालुका अध्यक्ष बालाजी देशमुख साई पाटील मोकासदरेकर सुदर्शन गाढे केशव हंबर्डे दिलीप हंबर्डे शहाजी जाधव बालाजी कुदळे साईनाथ कदम माधव भंडरवाड सोपान पाटील उमरेकर असंख्य छावाचे कार्यकर्ते उपस्थित होते या कार्यक्रमाचे नियोजन छावाचे संपर्क प्रमुख साई पाटील देगावकर यांनी केले.

# धर्माबाद पोलीस स्टेशन च्या उप निरीक्षक प्रियंका पवार मॅडम यांना जिल्हाधिकारी राऊत साहेब यांच्या हस्ते विशेष पदक प्रदान

लोकनेता न्यूज नेटवर्क
धर्माबाद | साहेबराव दुगाने

अवघ्या काही महिण्यापुर्वी धर्माबाद पोलीस स्टेशन येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून रुजू झालेल्या प्रियंका गजाननराव पवार यांना गोंदिया जिल्ह्यात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल विशेष पदक पुरस्कार ह्या पूर्वीच घोषित करण्यात आला होता, १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून ह्या पुरस्काराचे वितरणजिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते व पोलीस अधीक्षक यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आले आहे.
धर्माबाद पोलीस स्टेशन येथे येण्यापूर्वी प्रियंका गजाननराव पवार यांनी गोंदिया ह्या नक्षलग्रस्त भागात २०२० ते २०२३ पर्यंत त्यांनी आपली कर्तव्य यशस्वीरित्या पार पाडत भरीव कामगिरी केली होती, त्यांच्या ह्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल राज्याचे पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी विशेष सेवा पदक जाहीर केले होते. पोलीस उपनिरीक्षक प्रियंका गजाननराव पवार ह्या हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील पळशी ह्या गावच्या रहिवाशी असून त्यांनी गोंदिया त्या नंतर हिंगोली येथे उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.
धर्माबाद पोलीस स्टेशन येथे पवार मॅडम ह्या चालु वर्षातील फेब्रुवारी महिन्यात रुजू झाल्या असून अत्यंत शांत स्वभावाच्या असलेल्या प्रियंका पवार यांची कामाप्रति असलेली निष्ठा हेच त्यांच्या यशाच गमक आहे. पोलीस स्टेशन हद्दीतील विविध घटना, गुन्हे, स्त्री अत्याचार संबंधी गुन्हे असो कि अल्पवयिन मुलींचे योग्य असे समुपदेशन असो त्यांनी सर्वच बाबतीत आपली छाप सोडली आहेत.गोंदिया जिल्ह्यात केलेल्या उत्तम कामगिरीसाठी दि. १५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांच्या हस्ते विशेष पदक प्रदान करण्यात आले आहे. ह्या कार्यक्रमास अतिथी म्हणून विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर यांची उपस्थिती होती, ह्या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत प्रियंका पवार यांना सदरचे विशेष पदक देण्यात आले आहे, त्यांच्या ह्या पदक प्राप्तीबद्दलधर्माबाद उपविभागिय पोलीस अधिकारी प्रशांत संपते, धर्माबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड ,गुप्तचर खात्याचे संतोष आनेराय, हेडकॉनिस टेबल संगेवार संतोष व सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून त्यांना पदक प्रदान केल्याची माहिती मिळताच तालुक्यातील नागरिकांकडून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.



# माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन

## मोठ्या उत्साहात सोहळा संपन्न होणार–अंकिता पाटील–ठाकरे

लोकनेता न्यूज नेटवर्क
इंदापूर | बबनराव धायतोंडे

महाराष्ट्राचे माजी मंत्री व राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त बुधवारी (दि.२१) शहाजीनगर व इंदापूर येथे अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. परस्परांचा आनंद,आपुलकी व स्नेहभाव वृद्धिंगत होणाऱ्या या अभिष्टचिंतन सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहावे,असे आवाहन पुणे जिल्हा भाजप युवा मोर्चाचे अध्यक्षा अंकिता पाटील-ठाकरे यांनी केले आहे.
ऐतिहासिक इंदापूरचे सुसंस्कृत नेतृत्व असलेले हर्षवर्धन पाटील यांचा अभिष्टचिंतन सोहळा हा आनंद,नवी उमेद निर्माण करणारा व ऊर्जा देणारा असा असणार आहे.यानिमित्ताने आपणा सर्वांच्या शुभेच्छा स्वीकारण्यासाठी हर्षवर्धन (भाऊ) पाटील हे शहाजीनगर येथील भाग्यरत्न सांस्कृतिक भवन - निरा-भीमा सहकारी साखर कारखाना येथे सकाळी ९ ते दुपारी १ वा.पर्यंत उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर इंदापूर येथील श्री वाघ पॅलेस पुणे-सोलापूर हायवे या ठिकाणी सायंकाळी ४ ते रात्री ९ वा. पर्यंत उपस्थित राहणार आहेत.
या दोन्ही ठिकाणी स्नेह भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी शहाजीनगर आणि इंदापूर येथे होणाऱ्या अभिष्टचिंतन सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहण्याचे स्नेह निमंत्रण भाग्यश्रीताई पाटील,अंकिता पाटील-ठाकरे आणि राजवर्धन पाटील यांनी दिले आहे.

## चारोळी

**मायेचा धागा जोडतो**
**राखीपौर्णिमेचा सण**
**पदरात दान सौख्याचे तिच्या**
**आनंदून जाते भावूक मन.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

## झाडे लावा झाडे जगवा



# अक्कलकोट च्या ऐतिहासीक कारंजा चौकात माजी सैनिकांच्या हस्ते झाले ध्वजारोहण

लोकनेता न्यूज नेटवर्क
अक्कलकोट | प्रतिनिधी

अक्कलकोट च्या ऐतिहासीक कारंजा चौकात माजी सैनिकांच्या हस्ते स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. ऐतिहासिक कारंजा चौकात हे ऐतिहासिक ध्वजारोहण माजी सैनिकांनी केले.
येथील कारंजा चौक येथे दि.१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिना निमित्त नवभारत गणेशत्सव तरुण मंडळाच्या वतीने ध्वजारोहणाचा कार्यक्रम मोठ्या उत्सहात संपन्न झाला.स्वातंत्र्य दिनानिमित्त माजी सैनिकांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. याप्रसंगी माजी सैनिक जमादार, सुरवसे, लवटे व माजी राज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, दिलीपभाऊ सिद्धे, संयोजक विशाल राठोड, रईस टिनवाला, अरुण जाधव, मल्लीकार्जुने पाटील, , लाला राठोड, मैनुद्दीन कोरबु, बसवराज अळ्ळोळी, सुनिल सिद्धे, शैलेश राठोड, नितीन कटारे,. नवनित राठोड, शिवलींग कलबुर्गी, महमेद शेख, संजय घनाते, बाबु पुकाळे,, प्रकाश टाके, रूपेश कपूरे, सुदर्शन लवटे, अविराज सिद्धे, किशोर सिद्धे, पैगंबर सख, जेमुद्दिन लोबोळी कुकडे, संतोष बावणे, राहुल राठोड, संतोष राठोड, अमर पाटील, जयनारायण राठोड, विकास राठोड, रवि सुतार, अविनाश पोतदार यांच्यासह आदिजण उपस्थित होते.

# निवडणुका लागणार म्हणून फिरणाऱ्यांनी जनता कोरोना काळात मरणाच्या दारात होती तेव्हा कुठे गेले होते?-सुरेश धस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

स्वतःला पुढारी म्हणून घेणारे,निवडणुका लागणार म्हणून गावोगाव दौरे काढणारे कोरोना काळात जनता भयभीत होती,अक्षरशः मरणाच्या दारात होती अशा वेळी त्यांना धीर देण्याचे आणि त्यांना बळ देण्याचे काम ज्यांनी करायला पाहिजे होते त्या वेळेस हे सगळे माझे कुटुंब माझी जबाबदारी म्हणत घरात बसून होते.मात्र मी हातात भोंगा घेऊन लोकांच्या दारोदार जात भिऊ नका मी तुमच्या पाठीशी आहे म्हणत होतो मग त्या वेळी हे कुठे गायब झाले होते असा सवाल माजी मंत्री सुरेश धस यांनी विरोधकांना उपस्थित केला आहे.आष्टी तालुक्यातील पुंडी येथे टाकळी गणाच्या तर सुलेमान देवळा येथे धानोरा गणाच्यावतीने आयोजित जनसंवाद मेळाव्या प्रसंगी ते बोलत होते.पुढे बोलताना धस म्हणाले की,ज्या कोरोनाच्या कालावधीत नातेवाईक तर सोडाच सख्खे देखील जवळ येत नव्हते अशावेळी मी जीवाची परवा न करता सर्वसामान्य जनता गोरगरीब जनता या महामारीच्या खाईतून कशी बाहेर काढता येईल शिवाय कोरोनाच्या भीतीने अनेकांना धीर कसा देता येईल याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला यासाठी मी आष्टी पाटोदा शिरूर या तीनही तालुक्यातील गाव न गाव पिंजून काढले हातात भोंगा घेऊन भिऊ नका मी तुमच्या पाठीशी आहे हे ठामपणे सांगत होतो शिवाय मच्छिंद्रनाथ देवस्थानच्या माध्यमातून १३ हॉस्पिटल व ३३ कोविड सेंटर चालवण्याचे काम केले त्या माध्यमातून सर्वांना रुग्णसेवा उपलब्ध करून देण्याचे काम केलं. वेळप्रसंगी घरापासून पाच सहा महिने लांब राहावे लागले मात्र मी माझ्या जनतेला वाऱ्यावर सोडले नाही. कोविड सेंटर असेल कोविड रुग्णालय असतील त्या ठिकाणी असलेल्या रुग्णांशी मी स्वतः चर्चा करत होतो त्यांना धीर देण्याचे काम करत होतो णि हे काम स्वतःला पुढारी म्हणवून घेणाऱ्यांचे असते.अनेकांना लागेल ती मदत भले ती आर्थिक जरी असली तरी ती करण्याचे प्रामाणिक काम केले. म्हणूनच आज ही सर्वसामान्य जनता माझ्यावरती भरभरून प्रेम करते. मात्र सध्या आष्टी मतदार संघात निवडणुका जवळ येत असल्याने अनेकांनी गुडघ्याला



बाशिंग बांधले आहे अनेक इच्छुक निवडणूक लढविण्यासाठी तयार झालेले आहेत जे आता गावोगाव आपले दौरे करत आहेत आणि लोकांना आम्ही किती कामाचे आणि आम्हाला तुमचा किती कनवळा आहे हे दाखवण्याचा जो खोटा प्रयत्न करत आहेत त्याला सर्वसामान्य जनता कधीच बोलणार नाही हा माझा ठाम विश्वास आहे. त्यामुळे निवडणुका आल्या म्हणून दौरे काढणाऱ्यांनी सर्वसामान्य जनता मरणाच्या दारात असताना घरात बसणे पसंत केले अशांना आता कायमस्वरूपी घरात बसविल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे आगामी विधानसभेच्या कामाला माझ्या सर्व कार्यकर्त्यांनी लागावे असे आवाहन शेवटी धस यांनी केले.या मेळाव्या प्रसंगी व्यासपीठावर ह.भ.प. जगताप महाराज,ह.भ.प.आदेश महाराज,ह.भ.प.गोविद महाराज जगताप,माजी भाजपा तालुकाध्यक्ष पांडुरंग चौधरी,भाजपा जेष्ठ नेते रमेश ढगे,माजी उपसभापती गोपाळभाऊ रक्ताटे, भीमराव माळशिखरे बापू,जयशिंग गव्हाणे,सरपंच मनोज थोरवे,सरपंच भाऊसाहेब गावडे,राहुल सुरवसे,राजेंद्र गावडे,पंढरीनाथ भालेराव,सरपंच ईश्वर मेटे,सरपंच ज्ञानेश्वर खराडे,माजी सरपंच रिंकू बेलेकर,तानाजी अनभुले,भाऊसाहेब झांजे,अशोक तरटे,उपसरपंच पवन तरटे,माजी उपसरपंच महादेव शिंदे,के.के.काकडे,संदीप खराडे,उपसरपंच दळवी,पंडीत पोकळे,मुकेश काळे,सीताराम झांजे,परमेश्वर पांडुळे,सचिन एकशिंगे,संदीप चौधरी,धनंजय पडोळे,अशोक पडोळे,सूत्रसंचालन आकेश वाडेकर तर सुलेमान देवळा येथील मेळावा प्रसंगी जि.प.सदस्य रामहरी महारनोर,माजक सभापती अंकुश चव्हाण,माजी उपसभापती राजेंद्र दहातोंडे,पप्पू बांदल,माजी सरपंच अंकुश गीते,सुरेश गर्जे,अशोक घोडके,अशोक लगड,राजाभाऊ शेळके,आदीसह टाकळी अमिया गण व धानोरा गणातील प्रमुख कार्यकर्ते, पदाधिकारी, नागरिक,महिला भगिनी मोठया संख्येने उपस्थित होते.

# २१ ऑगस्ट च्या भारत बंद मध्ये ,धर्माबाद आरक्षण बचाव कृती समितीचा सहभाग



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद | साहेबराव दुगाने**

_मा. सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचि त जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील(ील,ीं) जातीचे आरक्षण अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्याचा राज्य सरकारला निर्देश दिलेला आहे. जो की मूळ आरक्षणाच्या विरोधात आहे. या उपवर्गीकरणाच्या संदर्भात देशपातळीवर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती तसेच ओबीसी इतर मागासवर्ग समुदायानी दि. २१ ऑगस्ट २०२४ रोजी भारत बंदचे आव्हान केले आहे. या भारत बंद मध्ये तालुका धर्माबाद येथील आरक्षण बचाव कृती समितीने सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.

दि. १८ ऑगस्ट रोजी येथील विश्रांतीगृहावर अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय कार्यकर्त्यांची बैठक घेऊन एक कार्यकारिणी गठीत करण्यात आली आणि सर्वानुमते २१ ऑगस्ट च्या बंद मध्ये भाग घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

एससी, एसटी व ओबीसी आरक्षण बचाव कृती समितीचे अध्यक्ष तथा शहर उपाध्यक्ष काँग्रेस चे विठ्ठलराव कोंडलवाडे, उपाध्यक्ष नवीन पाटील बन्नाळीकर, सचिव संपादक बाबुराव पाटील आलूरकर, सहसचिव अशोक पुजरवाड (शहर उपाध्यक्ष भाजप), कोषाध्यक्ष वंचित आघाडीचे तालुका अध्यक्ष एकनाथराव जिंकले, सह कोषाध्यक्ष पत्रकार सज्जन दत्तात्रेय, सल्लागार- माजी नगराध्यक्ष दिगंबर लखमावाड, मार्केट कमिटीचे माजी संचालक गोविंद पाटील सोनटक्के, एड. चंद्रप्रकाश कांबळे, विजयानंद स्वामी, संघटक-शिवसेना जिल्हा संघटक गणेश गिरी, माजी पंचायत समिती सभापती मारुती पाटील कागेरू, माजी नगरसेवक शंकर बोलमवार, माजी नगरसेवक बी. नारायण, प्रमुख मार्गदर्शक- कॉम्रेड मुकुंद कदम, माजी नगरसभापती सुधाकरराव जाधव बाळापुर, वंचित आघाडीचे तालुका सल्लागार जे. के. जोंधळे, भारिपचे माजी तालुका अध्यक्ष शंकरराव वाघमारे बनाळीकर, वंचित चे तालुका सरचिटणीस गौतम देवके, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुदर्शन वाघमारे.

सदस्य- भा.बौ.म. तालुका अध्यक्ष सदानंद देवके, पत्रकार गणेश पाटील हातनुरे, पत्रकार नागनाथ माळगे, आवनदास वाघमारे हसणाळी, आणि रिपब्लिकन सेना तालुका अध्यक्ष धर्माबाद , रिपब्लिकन सेना युवा तालुका अध्यक्ष राजकुमार वाघमारे बन्नाळीकर यांनी भारत बंदच्या आंदोलनात सहभागी होण्याचे अनुसूचित जाती, जमाती व इतर मागास वर्गातील सर्वांना आवाहन केले आहे.

# सुरजखेडा येथे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांचा जयंती महोत्सव उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव | महादेव हरण**

सेनगांव तालुक्यातील सुरजखेडा या ठिकाणी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा १०४ वा जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात आज दिनांक १८ ऑगस्ट रोजी संपन्न झाला आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेश युवक सरचिटणीस परमेश्वर इंगोले तर कार्यक्रमाचे उद्घाटक प्रदेश उपाध्यक्ष भागवत डोंगरे हे होते. स्वागत अध्यक्ष पदी माजी जिल्हा परिषद सदस्य नारायणराव मगर उपस्थित होते यावेळी सर्वप्रथम साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला असून यावेळी मान्यवरांनी उपस्थित नागरिकांना अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर मार्गदर्शन केले.तसेच याप्रसंगी सरपंच शांताबाई मोरे यांच्या हस्ते सकाळी ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला आहे.



# बीड जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीत ग्रंथपाल सचिवपदी अॅड.भीमराव जगताप यांचा विक्रमी विजय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | प्रतिनिधी**


बीड जिल्ह्यात फार मोठा असा वकील संघ असून या वकील संघाच्या बीड जिल्ह्याच्या निवडणुकीत अतिशय रोमहर्षक पद्धतीने ही निवडणूक पार पडलीया निवडणुकीत दोन पॅनल निवडणुकीसाठी सज्ज होते यात एकता पॅनल व दुसरा परिवर्तन पॅनल असे हे दोन समोरासमोर होते या पॅनल मधील उमेदवारांना चांगल्या मताधिक्याने निवडून आणून रोमहर्षक पद्धतीने विजय प्राप्त केला.

यामध्ये प्रामुख्याने ड. भीमराव जगताप यांनी ग्रंथपाल सचिव या पदासाठी सर्वात जास्तीचे मतदान घेऊन फार मोठ्या फरकाने विजय मिळवला आहे यामुळे यांचे सर्व स्तरातून व सर्व वकील संघाच्या माध्यमातून फार मोठे कौतुक केले जात आहे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा या निवडणुकीतून उमटवून त्यांनी या पॅनल साठी भरभरून जे मतदान



घेतलं आहे जो आशीर्वाद रुपी वकिलसंघाचा पाठिंबा घेतला आहे तो कौतुकास्पद आहे.सन २०२४-२०२५ या निवडणुकीमध्ये वकील संघाचे एकूण मत ७८० पैकी ६७० मतदान झाले. अध्यक्षपदी ड. रोहिदास येवले यांना मते ३४९ झाली ते ४७ मताने विजयी झाले.उपाध्यक्ष पदी ड. नितीन वाघमारे व ड. अविनाश गडगे यांना मते ३२२ समान मते मिळाली व दोघांना पद सहा सहा महिने मिळाली. सचिव पदी ड. यासेर पटेल यांना ३२६ मते मिळाली ते २१ मताने विजयी झाले सह सचिव पदी ड. श्रीकांत जाधव यांना २६२ मते मिळाली ते १७ मताने विजयी झाले.कोषाध्यक्ष पदी ड धनंजय गिराम यांना ४०८ मते मिळाली ते १७६ मताने विजयी झाले.ग्रंथपाल सचिव ड. भिमराव जगताप यांना ४१३ मते मिळाली ते २२७ सर्वात जास्त विक्रमी मताने विजयी झाले.महिला प्रतिनिधी पदी ड. छाया वाघमारे यांना ४०५ मते मिळाली त्या १७३ मताने विजयी झाल्या.सर्व वकील बांधवांनी यांना सहकार्य करून व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या

## अतूट बंधन..



बहीणभावाचा सण
पवित्र रक्षाबंधन
नाते विश्वासाचे
जपते अतूट बंधन


ओवाळीते भाऊरायाला
दिर्घायुष्य लाभो जीवनी
सुखसमृद्धी,भरभराट होवो
हीच इच्छा,आकांक्षा मनी

राखी बांधते सौख्याची
मांगल्याचा टिळा लावते
अतूट बंधन आपले
सर्वांनाच खूप भावते

सुखदुःखात नेहमी
उभा राहतो पाठीमागे
काळजाच्या कुपीत
जिव्हाळ्याचे दिसती धागे

ओवाळणी काही नको
आयुष्यभर दे साथ
डोक्यावर राहू दे
आशीर्वादाचा हात

वाढतच राहील कायम
आम्हा बहिणींची माया
तुझीही राहू दे आमच्यावर
प्रेमळ अशीच छत्रछाया



**रुपाली तुकाराम भोरकडे,**
**शिक्रापूर: (बबनराव धायतोंडे)**

# महायुती सरकारमुळेच 'मार्टी' ची स्थापणा,ना.संजय बनसोडे मुळे उदगीर मतदार संघात विकासाची कामे,अल्पसंख्याक समाज महायुती सोबत-इद्रीस नाईकवाडी

### तीन राज्याच्या सिमेवर असल्यामुळे भविष्यात उदगीर येथे विमानतळ व मेडिकल कॉलेज उभारणार-ना.संजय बनसोडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर | सुनिल बस्वराज हावा**

उदगीर गेल्या अनेक वर्षापासून मुस्लीम समाजाची मागणी होती की मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांना देशात व परदेशात

उच्च शिक्षण घेण्यासाठी मार्टी योजना लागू करावी त्यांच्या या मागणीची दखल महायुती सरकारने घेवुन मार्टी योजनेची स्थापणा केली.उदगीर हे तीन राज्याच्या सिमेवर असल्यामुळे भविष्यात उदगीर येथे मेडिकल कॉलेज आणि विमानतळ उभारण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न करणार असल्याचे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले.

ते उदगीर येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्यांक विभाग प्रमुख कार्यकर्ता बैठकीस मार्गदर्शन मेळाव्यात बोलत होते.

यावेळी अल्पसंख्याक प्रदेश अध्यक्ष इद्रिस नाईकवाडी यांनी समाज बांधवांना मार्गदर्शन करताना म्हणाले ना.संजय बनसोडे हे सर्व समाजाला घेऊन चालणार सर्व सामान्य नेता आहे.त्यांच्या काळात मुस्लिम समाजाचे प्रचंड कामे झाली आहेत.महायुती सरकारने मुस्लिम समाजासाठी शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी मार्टी योजना आनली आहे.म्हणून आपला समाज महायुती व ना.संजय बनसोडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून मोठ्या




मताधिक्याने निवडून आनावे. यावेळी अहमदपुरचे आमदार बाबासाहेब पाटील, महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष वसीम बु-हाण, शफी शेख, मोबीन सिद्दीकी, जिल्हाध्यक्ष अफसर शेख, प्रदेश सरचिटणीस अँड.व्यंकट बेद्रे, प्रदेश सरचिटणीस समीर शेख, खाजा तांबोळी, अल्पसंख्यांकचे जिल्हाध्यक्ष शफी हाशमी, श्याम डावळे, प्रविण भोळे, तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, समद शेख, नजीर हाशमी, फय्याज शेख,चंद्रशेखर पाटील अतनूरकर, इब्राहिम देवर्जनकर, दत्ता पाटील, वैशाली कांबळ,अझहर मोमीन, इब्राहिम पटेल, फेरोज पठाण, अशदुल्ला बेग, रऊफ शेख , मधुमती कनशेट्टे, काजल मिरजगावे, खाजा पटेल, अतिक शेख, श्याम ढोबळे, युसुफसाब वाडीवाले, ईस्माईल बागवान, शेख मेहताब, आयुब टप्पेवाले, मुक्तार शेख, बाबर बनशेळकीकर, पाशा बेग, अबरार पठाण, सोनु हाशमी, आझम पटेल, इमरोज पटवेघर, अशरफ देशमुख, जावेद शेख, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, मुस्लीम समाजाची शिक्षणाने प्रगती व्हावी म्हणून महायुती सरकारने मार्टी ची स्थापना केली. अल्पसंख्यांक समाज हा मुख्य प्रवाहात येईल. मार्टी योजनेमुळे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. यामुळे मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांना विविध पदावर काम करण्याची संधी उपलब्ध होणार असुन या योजनेचा मुस्लीम समाजातील विद्यार्थांनी लाभ घेवुन आपले व आपल्या शहराचे नाव मोठे करावे. आपल्या मतदार संघात अल्पसंख्याक वस्तीगृहाला निधी दिला. शासकीय अध्यापक विद्यालयाच्या समोर मुस्लीम शादीखाना उभारला, मुस्लीम मोहल्यात रस्ते, पाणी, वीज या मुलभुत गरजा पुरवुन त्या - त्या वार्डात सभागृह उभारले, ईदगाह मैदानावर संरक्षण भिंत बांधण्यासाठी निधी दिला, क्रबस्तानातील संरक्षण भिंत बांधकामासाठी निधी व विविध मस्जीदला निधी उपलब्ध करुन दिला. मार्टी या योजनेसाठी आम्ही गेल्या ६ महिन्यापासुन या योजनेचा पाठपुरावा करत होतो म्हणून यश आले. शासनाच्या विविध योजना सर्वसामान्यांच्या दारी पोहचवल्या. उदगीरमधुन मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे तालुक्यात ६० हजार फार्म भरले गेले. भविष्यात उदगीर येथे विमानतळ, मेडिकल कॉलेज उभारणार असुन उदागिर बाबांच्या नावाने 'वंदे भारत ' रेल्वे सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ना.बनसोडे यांनी सांगितले. यावेळी उदगीर शहर परिसरातील समाजबांधव व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते व अल्पसंख्यांक सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक लोकनेता



# मतदार बंधू भगिनींनो तुम्ही हाक द्या, साथ आमदार शिंदे कुटुंबीयांची सदैव राहील; सौ.आशाताई शिंदे

## पुणे येथील संवाद बैठकीस हजारो महिला भगिनी मतदारांचा उत्स्फूर्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा कंधार मतदारसंघातील पुणे शहर व परिसरात वास्तव्यास असणाऱ्या मतदार बंधू भगिनींची संवाद बैठक पुणे येथील संकल्प मंगल कार्यालय येथे काल दि.१८ ऑगस्ट रविवार रोजी संवाद बैठक संपन्न झाली, या संवाद बैठकीस लोहा कंधार मतदार संघाचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष आमदार शामसुंदर शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शामसुंदर शिंदे , लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा युवा नेते विक्रांत पाटील शिंदे, सौ. अनुजाताई विक्रांत पाटील शिंदे, कंधार बाजार समितीचे संचालक रोहित पाटील शिंदे, पुण्याच्या नगरसेविका शितल टिळेकर प्रमुख उपस्थित होते , यावेळी आमदार शामसुंदर शिंदे, सौ.आशाताई शिंदे, सभापती विक्रांत पाटील शिंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले, यावेळी लोहा कंधार मतदार संघातील मतदारांच्या वतीने आमदार शामसुंदर शिंदे, आशाताई शिंदे, सभापती विक्रांत पाटील शिंदे, सो अनुजाताई विक्रांत पाटील शिंदे यांचा पारंपारिक खारीक खोबऱ्याचा भव्य हार घालून सत्कार करण्यात आला ,यावेळी या संवाद बैठकीस उपस्थित असलेल्या पुणे शहर व परिसरातील हजारो मतदारांशी आमदार शामसुंदर शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई शिंदे, सभापती विक्रांत पाटील शिंदे यांनी हितगुज करून संवाद साधला, यावेळी आमदार श्यामसुंदर शिंदे संवाद बैठकीत बोलताना म्हणाले की लोहा कंधार मतदारसंघाचा सर्वांगीण विकास केल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नसून लोहा कंधार मतदारसंघांमध्ये गेल्या चार वर्षात अनेक महत्त्वपूर्ण संवेदनशील विषय मी तळमळीने सोडवलेले असून मतदारसंघातील नागरिकांना दर्जेदार शिक्षण, आरोग्य ,वीज, स्वच्छ पाणी, दळणवळण यासह इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी व मतदारसंघातील सिंचन प्रकल्पांमध्ये वाढ होण्यासाठी,व मंजूर झालेले सिंचन प्रकल्प मार्गी लावण्यासाठी मी या भागाचा आमदार म्हणून सदैव कटिबद्ध असल्याची ग्वाही यावेळी आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी बोलताना दिली ,या संवाद बैठकीस संबोधित करताना सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई शिंदे म्हणाल्या की आमदार शामसुंदर शिंदे यांच्या माध्यमातून लोहा कंधार मतदार संघातील अनेक गरजू नागरिकांना आमदार शिंदे यांनी मुंबई, ठाणे, पुणे अशा मोठमोठ्या मेट्रो शहरांमध्ये रोजगार उपलब्ध करून दिलेली असून अनेक लोकांच्या अडीअडचणी प्राधान्याने सोडवलेल्या आहेत, लोहा कंधार मतदारसंघात विविध विकास कामासाठी आमदार शिंदे यांनी कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करून आणलेला आहे, विष्णुपुरी प्रकल्पाचा प्रलंबित विषया संदर्भात आमदार शिंदे यांनी १६० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणलेला असल्याने मतदारसंघातील अनेक गावातील शेती सुजलाम सुफलाम होणार असून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणार असून गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला पानशेवडी प्राथमिक आरोग्य केंद्राचा प्रलंबित विषय आमदार शिंदे यांनी सोडवलेला आहे ,लोहा कंधार मतदारसंघात अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली अनेक विकास कामे आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या माध्यमातून प्रामाणिकपणे



पूर्ण झालेली आहेत, लोहा कंधार मतदारसंघाला सुजलाम सुफलाम करण्याचे स्वप्न आमदार श्यामसुंदर शिंदे घराण्याचे असून आम्ही लोहा कंधार मतदार

संघाला मॉडेल मतदार संघ करण्यासाठी सदैव कटिबद्ध असल्याची ग्वाही यावेळी आशाताई शिंदे यांनी संवाद बैठकीत मतदारांशी बोलताना दिली, मतदार बंधू भगिनींनो तुम्ही आमदार शिंदे कुटुंबीयांना हक्काने हाक द्या, आमदार शिंदे कुटुंबीय सदैव तुम्हाला साथ देईल अशी ग्वाही यावेळी आशाताई शिंदे यांनी पुणे येथील मतदार बंधू भगिनी संवाद बैठकीत बोलताना दिली, यावेळी उपस्थित मतदार बंधू भगिनींनी आमदार श्यामसुंदर शिंदे, आशाताई शिंदे, सभापती विक्रांत पाटील यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत पाटील शिंदे म्हणाले की विकास करणाऱ्यांच्या पाठीशी मतदारांनी खंबीरपणे उभं राहून त्यांना बळ दिले पाहिजे आणि आपल्या लोहा कंधार मतदारसंघाचा विकास साधला पाहिजे यासाठी मतदारांनी आमदार शिंदे यांच्या पाठीशी भक्कमपणे राहावे असे आव्हान यावेळी विक्रांत पाटील शिंदे यांनी केले, यावेळी लोहा कंधार मतदारसंघातील व पुणे शहर व परिसरात वास्तव्यास असलेले हजारो मतदार बंधू भगिनी यावेळी मोठ्या संख्येने स्वयंस्फुर्तीने उपस्थित होते, लोहा कंधार मतदारसंघात विधानसभेची निवडणूक अत्यंत चुरशीची होणार असून सौ. आशाताई शिंदे या महाविकास आघाडीच्या संभाव्य उमेदवार राहणार असल्याने आमदार शामसुंदर शिंदे व आशाताई शिंदे यांच्या पुणे येथील मतदार बंधू भगिनी संवाद बैठकीस अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे , या संवाद बैठकीस पुणे शहर व परिसरातील महिला भगिनी मतदार हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. पुणे शहर व परिसरातील मतदार बंधू भगिनींच्या वतीने सौ.आशाताई शिंदे, सभापती विक्रांत पाटील शिंदे,सौ. अनुजाताई विक्रांत पाटील शिंदे यांचा फटाक्यांची भव्य आतिषबाजी व भव्य पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला, यावेळी कार्यक्रमाचे आयोजक शरद पाटील ,माऊली पाटील, नगरसेविका शितल टिळेकर, माळाकोळी चे सरपंच मोहन काका शूर, समन्वय समिती सदस्य बालाजी ईसादकर, समन्वय समिती सदस्य सिद्धू पाटील वडजे, खरेदी विक्री संघाचे संचालक सुधाकर सातपुते , कंधार संजय गांधी निराधार योजना समिती सदस्य अवधूत पेटकर, चेअरमन नागेश हिलाल, खांबेगावचे सरपंच संदीप पाटील पौळ, मजरेसांगवी चे सरपंच राम पाटील शिरसाठ, वाकाचे सरपंच गोपीराज पाटील हंबर्डे, धनज चे सरपंच पंजाब पाटील माळेगावे, जोमेगावचे सरपंच आदिनाथ पाटील शिंदे , राजू पाटील कापसीकर, मा. सरपंच गोविंदराव पाटील चिंचोलीकर, सुगावचे मा.सरपंच विजय पाटील जाधव, माजी सरपंच पप्पू भुरे, डोणवाडाचे उपसरपंच हनुमंत पाटील जाधव, जंगमवाडीचे उपसरपंच अशोक बोधगिरे , प्रदीप पाटील हुंबाड, एजाज भाई भोसीकर,लोहा तालुका संजय गांधी निराधार योजना समिती सदस्य अशोक सोनकांबळे, अजय हंकारे ,सतीश कराळे सह कार्यकर्ते, पदाधिकारी सह लोहा कंधार मतदारसंघातील व पुणे शहर व परिसरातील हजारो मतदार बंधू भगिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्याम पाटील कपाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन सचिन पाटील कुदळकर यांनी केले.

---

# जळकोट तालुक्यातील पीक नुकसानीची ना. संजय बनसोडे यांनी केली पाहणी

### शेतकऱ्यांना सरसकट मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार

## नुकसानीचे पंचनामे तातडीने करा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

उदगीर मतदार संघातील जळकोट तालुक्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जावून पाहणी केली. तसेच या नुकसानीचे पंचनामे करून त्याबाबतचा अहवाल तातडीने सादर करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार सुरेखा स्वामी, गट विकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहूल केंद्रे, तालुका कृषि अधिकारी आकाश पवार यांच्यासह शेतकरी यावेळी उपस्थित होते. केकत शिंदगी, होकर्णा, वडगाव येथील पीक नुकसानीची पाहणी केल्यानंतर ना. बनसोडे यांनी वडगाव येथील हनुमान मंदिरात शेतकरी, नागरिकांशी संवाद साधून नुकसानीची माहिती घेतली. पावसामुळे पिकांचे, रस्त्यांचे नुकसान झाल्याची माहिती यावेळी शेतकऱ्यांनी दिली. तसेच सुमारे आठ ते नऊ गावांमध्ये साडेतीन ते चार हजार हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन, कापूस, मूग आदी पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असल्याचे तालुका कृषि अधिकारी श्री. पवार यांनी सांगितले नुकसानीची माहिती मिळताच दूरध्वनीद्वारे प्रशासनाला पीक नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले होते. आज प्रत्यक्ष पाहणी करताना शेतपिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिसून आले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी नुकसान पंचनाम्याचा अहवाल त्वरीत शासनाला सादर करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले. तसेच शेतकऱ्यांना सरसकट मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

---

### श्री.महागणेश दूध संकलन केंद्राच्या माध्यमातुन

# अनेक शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून प्रगतीचा राजमार्ग निर्माण करणारा अवलिया-डॉ.वाळके

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**





शेतीच्या अनेक जोडधंद्यांपैकी सर्वांत जुना आणि शाश्वत जोडधंदा म्हणजे पशुसंवर्धन (रपळारश्र हीीलरपवी). आपल्या पूर्वजांपासूनचा हा पारंपरिक व्यवसाय.भूमाता आणि गोमातेचे संवर्धन करणाऱ्या भूमिपुत्राला त्यांनी कधीही अडचणीत आणले नाही.लोणी सय्यदमिर हे गाव कायम अडचणीत असताना.एकदम कमी प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.बेरोजगार तरुणांची संख्या भरपूर असताना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे गरजेचे होते.ते ओळखूनच

लोणी सय्यदमीर येथील पशुवैद्यकीय डॉ.ईश्वर वाळके यांनी शेतकऱ्यांची अडचण पाहून श्री.महागणेश दूध संकलन केंद्र स्थापन करण्याचा यशस्वी निर्णय घेतला.व त्यांच्या या निर्णयाला गावातील शेतकऱ्यांचा जोरदार प्रतिसाद मिळाला.गावातली तरुण बेरोजगार यांना रोजगार मिळवून देण्यासाठी दूध संकलन केंद्राच्या माध्यमातून डॉ.ईश्वर वाळके यांनी प्रयत्न केले.आज गावातील तसेच आजूबाजूच्या पंचक्रोशीत श्री महागणेश दूध संकलन केंद्राची यशस्वी वाटचाल सुरू असून.भरपूर प्रमाणात दूध संकलन होत आहे.व संपुर्ण पंचक्रोशीत श्री.महागणेश दूध संकलन केंद्राने नावलौकिक प्राप्त केला आहे.गावातील बेरोजगार तरुणांना दूध संकलन केंद्राच्या माध्यमातून रोजगार मिळाला असून त्यांच्याही जीवनावश्यक वस्तूची पूर्तता होत आहे. व त्यांच्या जीवनाला हातभार लागत आहे.अनेकांच्या मदतीला धावणारे म्हणून डॉ.ईश्वर वाळके यांनी ख्याती आहे.

शेतकऱ्यांची या एकत्रित व्यवसायामुळे भरभराटच झालेली आहे.गोमाता आणि भूमाता या शेतकऱ्यांच्या दोन्ही माता-दोघी सख्ख्या बहिणी.त्या एकमेकींशिवाय राहूच शकत नाहीत.निसर्गाने त्यांना एका चांगल्या चक्रामध्ये बसविलेले असूनही आपण मात्र त्यांची ताटातूट करतो.दुग्ध व्यवसायाचे इतर पिकांच्या तुलनेने महत्व बघितले तर दुग्ध व्यवसाय हा संपूर्ण विदर्भात कोणत्याही जिल्ह्यात करता येऊ शकतो.इतर शेत पिकांच्या तुलनेने दुग्ध व्यवसाय ३६५ दिवस शेतकऱ्यांना पैसा कमावून देणारा व्यवसाय आहे.या व्यवसायातून मोठ्या प्रमाणात कायस्वरूपी रोजगार निर्मिती होते व सर्वात महत्वाचे म्हणजे दूध हे जीवनावश्यक असल्याने आर्थिक मंदी किंवा कोरोनासाख्या महामारीच्या काळात देखील हा व्यवसाय जोमाने सुरू आहे.आपल्या देशात केला जाणाऱ्या दूध व्यवसायात तंत्रज्ञानाचा मर्यादित वापर असला तरी त्याचा एक फायदा देखील आहे,तो म्हणजे मोठ्याप्रमाणात लोकांच्या हाताला रोजगार मिळतो.जनावरे चारणे,दूध काढण्यापासून तर प्रकिया केंद्रातील कामगार... घरोघरी दूध विकणाऱ्या वितरकांपर्यंत रोजगार निमिर्तीची मोठी साखळी उभी होते.ती वर्षातील ३६५ दिवस रोजगार देत असते.या सर्व प्रक्रियेत विदर्भ मात्र अजून मागास आहे. विदर्भात काही भागात शेतकरी दूध व्यवसाय करतात पण तो असंघटित स्वरूपाचा आहे. त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांना संघटित दूध व्यवसायाचे फायदे मिळत नसल्याने आपले शेतकरी दूध व्यवसायाकडे दुर्लक्ष करतात. परंतु श्री.महा गणेश दूध संकलन केंद्र यांनी एक नवा आदर्श घालून तरुण युवकांना रोजगाराची संधी मिळवून दिली आहे.त्याबद्दल डॉ.ईश्वर वाळके यांचे लोणी गावातील सामाजिक कार्यकर्ते बाबु देवकर,तसेच लोणी येथील तरूण युवकांसह संपूर्ण आष्टी तालुक्यात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सोशल मीडियावर अभिनंदन होत आहे.

---

# नांदेड येथे राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित दादा पवार गटा मध्ये मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांचा जाहीर प्रवेश



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

नांदेड येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित दादा पवार गटाची बैठक संपन्न यावेळी नांदेड जिल्हाध्यक्ष जीवन पाटील घोगरे, मनिष पाटील वडजे प्रदेश कार्यकारिणी सदस्य, प्रवीण धुले ,मयूर कोकाटे, रामनारायण बंग, सुशीलकुमार जाधव,माधव चिंचाळे युवक कार्याध्यक्ष,मोहसीन खान युवक अध्यक्ष, फिरोज पटेल शहर कार्यालय,राजेंद्र दमाम सिने कलाकार / उद्योजक,गौतम भुरे, प्रमोद पवार सुरेखा पाटील ,शांतीलाल जैन गजभारे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटामध्ये नांदेड येथे मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांनी प्रवेश केला असून ते पुढीलप्रमाणे आहेत अनिस खान,अ. मुजीब, आदिल खान, मो.जावीद,शे रमजान ,रहिम खान ,मो.अब्दुल कलीन ,शे.साकेर, मो सलीम, सुनील ताटे ,शेख रशीद,जूनेद खान, शेख अमान,जहीर खान,मो.आमेर, संदीप साहेबराव नवघडे यांनी अजित दादा पवार यांच्या गटामध्ये सहभागी झाले आहेत.

---

# शेतकरी नेते मारोती गीते यांनी घेतली मनोज जरांगे (पाटील)यांची भेट

## मराठा समाजाच्याआरक्षण विषयी केली चर्चा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली जिल्ह्यातील (नागा)सिनगी येथील रहिवासी असलेले शेतकरी नेते मारोती गीते यांनी दिनांक १६ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी येथे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन मराठा समाजाला आरक्षण मिळावे या विषयावर चर्चा केली मारोती गिती हे नेहमी शेतकऱ्याच्या न्याय हक्कासाठी आवाज उठवत असल्याने मराठा आंदोलनामध्ये देखील मारोती गीते यांचा सहवास असल्याने मारोती गीते व त्यांचे कार्यकर्ते यांनी १६ ऑगस्ट रोजी अंतरवारी सराटी येथे जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आहे व आगामी निवडणुकीसाठी कशाप्रकारे काम करून मराठा समाजाला न्याय देता येईल या विषयावर याविषयी चर्चा केली,



# सत्य निर्मिती महिला मंडळातर्फे शालेय साहित्याचे वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड | सय्यद रहीम राजा**





उमरखेड तालुक्यात स्थापित असलेली सत्य निर्मिती महिला मंडळ यांच्या वतीने नववी व दहावी विद्यार्थ्यांना शालेय पुस्तक संच तसेच शालेय लेखी संच वाटण्यात आले मागील पंधरा वर्षापासून सुरू असलेली हे अभियान कायम ठेवण्यात आले सत्य निर्मिती महिला मंडळ उमरखेड याच्यावतीने बेटी पढाव भविष्य बचाव असे अभियान सुरू करण्यात आले आणि या अभियानांतर्गत मुलींना व महिलांना शैक्षणिक दृष्ट्या सहायता मिळावी याकरिता सत्यनिर्मिती महिला मंडळ राष्ट्रीय अध्यक्ष शबाना खान यांनी या अभियानाची सुरुवात केली या अभियानाला शासनातर्फे कोणतेही अनुदान येत नसून हे अभियान सत्यनिर्मिती महिला मंडळ आपल्या वतीने व समाजातील सामाजिक कार्यकर्ते यांच्या सहकार्याने चालवीत आहे बेटी पढाव भविष्य बचाव हे अभियान सन २०१० मध्ये सुरू करण्यात आले आणि या अभियानामध्ये ज्या मुलींना शिक्षणाची ओढ आहे परंतु त्यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्यामुळे ते पुढील शिक्षण घेत नाही अशा मुलींना सत्यनिर्मिती महिला मंडळ आर्थिक सहायता करून त्यांना पुढील शिक्षणासाठी लागणारे साहित्य प्रदान करते शासनाने सर्व शिक्षण अभियानांतर्गत फक्त आठवीपर्यंतच विद्यार्थ्यांना शालेय पुस्तक देण्यात येते याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना कोणतेही सुविधा देण्यात येत नाही आणि अशा मुळे जास्तीत जास्त मुली हे आठवी नंतर शिक्षण घेत नव्हते त्याचे महत्त्वपूर्ण कारण हे असते की त्यांच्याकडे पुस्तक घ्यायला किंवा लेखी संच घ्यायला तसेच प्रॅक्टिकल बुक्स घ्यायला पैसे नसायचे पण सत्यनिर्मिती महिला मंडळ अशा गर्जुवंत मुलींना शालेय पुस्तक संच लेखी पुस्तक संच तसेच प्रॅक्टिकल बुक्स आणि वेळोवेळी लागणारी शालेय साहित्य विनाशुल्क प्रदान केले आणि आज ही करते ज्यामुळे आज उमरखेड तालुका मध्ये मुलींचे शिक्षण वाढले सत्यनिर्मिती महिला मंडळ हे जिल्ह्यातील एकमेव महिला मंडळ अशी आहे की जे सतत १५ वर्षांपासून मुलींना शिक्षणासाठी लागणारे साहित्य देऊन त्यांना शैक्षणिक दृष्ट्या प्रबळ बनवत आहे स्वातंत्र्य दिना निमित्त १५ अगस्त ते ३० ऑगस्ट स्वातंत्र सप्ताहामध्ये दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सत्य निर्मिती महिला मंडळ उमरखेड यांनी उमरखेड शहरातील शाळांना भेट देऊन तेथील गर्जवंत विद्यार्थिनींना शालेय साहित्य वाटप केले आणि सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या काही अडचणी असल्यास नी संकोच सांगण्यास त्यांना सांगितले आणि सर्व विद्यार्थ्यांनी आपापली समस्या त्यांच्यासमोर मांडली तसेच अध्यक्ष सौभाग्यवती शबाना खान यांनी मुलींना मोलाचे मार्गदर्शन केले आणि कोणत्याही क्षणी महिला मंडळ ची आवश्यकता असल्यास ते सदैव विद्यार्थींसाठी तयार आहे आणि होईल तेवढे प्रयत्न करून त्यांची सहायता करण्यात येईल याचे वचन दिले यावेळी सत्यनिर्मिती महिला मंडळ टीमचे सर्व पदाधिकारी सौ डॉक्टर वंदना मसूरळकर मॅडम, सौ रेहाना सिद्धी सौ तब्बसुंम सौआनंदी पुरी कु शैला धाडे सौ सविता निलेश पवार ,रेहाना दादू सौ सविता भागवत सौ निलोफर मॅडम सौ मुबीना शेख फरजना शेख कू मीनाक्षी शिंदे तसेच सर्व सदस्य आणि उमरखेड शहरातील नगरपरिषद आणि जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांचे कर्मचारी वर्ग व विद्यार्थी वर्ग हजर होते यावेळी सर्वांना सत्यनिर्मिती महिला मंडळ तर्फे स्वतंत्र दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# सावळेश्वर येथील चेतनच्या आईला एक लाख ११ हजार दोनशे रुपये मदत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड | सय्यद रहीम राजा**



उमरखेड तालुक्यातील सावळेश्वर येथे दिनांक २६ जून २०२४ रोजी पैनगंगा नदीमध्ये दोन मुली पाण्यात बुडत असलेल्या पाहून कोणताही विचार न करता चेतन देवानंद कांबळे ह्याने पाण्यात बुडत असणाऱ्या दोन मुलीला वाचूवण्या करिता गेला असता दुर्दैवाने त्याचा सुद्धा पाण्यात बुडून मृत्यू झाला.व दोन मुली व एक मुलगा मरण पावल्यामुळे सावळेश्वर गावावर दुःखाचा डोंगर कोसळला होता.चेतन ची ही आई विधवा आणि दोन बहिणी त्यात एक बहीण अपंग असल्यामुळे घरातील सर्व जबाबदारी चेतन वर पडली होती, पण चेतन गेल्यामुळे या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली होती. त्यामुळे गावाचे पोलीस पाटील अनिल कांबळे यांनी आदर्श गाव या सावळेश्वर येथील व्हाट्सअप ग्रुपवर एसएमएस करून नागरिकांना आव्हान केले की आईला मदत करावी.

हा एसएमएस उमरखेड शहरातील निर्भीड निस्वार्थी पत्रकार सिद्धार्थ ओमप्रकाश दिवेकर यांच्याकडे पोहोचल्याने तात्काळ दैनिक प्रबुद्ध परिवार, दैनिक सचित्र न्यूज व इतर अनेक वृत्तपत्रांमध्ये छापून आईला मदत करा ही बातमी व्हायरल झाल्यामुळे चेतनच्या आईला एक लाख ११ हजार दोनशे रुपयाची मदत झाली. एक लाख रुपयाची एफडी चेतनची बहीण तेजल हिच्या नावे करण्यात आले व उर्वरित अकरा हजार दोनशे रुपयांचा किराणामाल चेतनच्या आईला सुपूर्त करण्यात आला.ही मदत पाहून या आईच्या डोळयात अश्रू थांबले नाहीत.यावेळी अनिल कांबळे पोलीस पाटील चिंतामणजी काळबांडे, विवेक रावते, सिद्धार्थ काळबांडे, शेख आजार, अरविंद रावते इत्यादी अनेक गावातील मंडळी उपस्थित होती.

# इंदापूर महाविद्यालयात रंगली काव्यमैफिल




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर | बबनराव धायतोंडे**


इंदापूर येथील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयांमधील कनिष्ठ महाविद्यालयाच्या मराठी विभागाने राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष माजी मंत्री आणि संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १७ ऑगस्ट रोजी काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. इंदापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जीवन सरवदे,उपप्राचार्य प्रा.दत्तात्रय गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.प्रा.दत्तात्रय गोळे म्हणाले की,विद्यार्थ्यांमध्ये कविता रुजविण्यासाठी तसेच त्यांच्यातील सृजनशीलतेला वाव देण्यासाठी असे कार्यक्रम आवश्यक आहेत. विद्यार्थ्यांबरोबरच प्रा.संतोष पानसरे,प्रा.राजीव शिरसट,प्रा.अमित दुबे, प्रा.कल्याणी देवकर, प्रा.शरद पवार,प्रा.अभिजित भोसले,प्रा.प्रसाद गायकवाड यांनी देखील कविता सादर केल्या.काव्य-वाचन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. युवराज फाळके,प्रा.अभिजीत भोसले,प्रा.शरद पवार आणि प्रा.कल्याणी देवकर यांनी कार्य केले.प्रा.भारत शेंडे,प्रा.सुनील सावंत,प्रा.आबासाहेब घोळवे,प्रा.रवींद्र हगवणे,प्रा.हर्षवर्धन सरडे, प्रा.सागर गुजराथी,प्रा.रवींद्र साबळे,प्रा.अमोल मगर,प्रा.रोहिदास भांगे उपस्थित होते.प्रा.संतोष पानसरे यांनी काव्यवाचन स्पर्धेचे सूत्रसंचालन केले आणि आभार मानले.

# ई-पीक पाहणी ॲप सर्व्हर डाऊनमुळे शेतकरी हैराण

## दि.१ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर पर्यंत ई पीक पाहणीचा कालावधी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**



शेतकरी स्वत:हून त्यांच्या शेतातल्या पिकांची नोंद सातबारा उताऱ्यावर करू शकणार आहे.माझी शेती माझा सातबारा मीच नोंदविणार माझा पीकपेरा' या उपक्रमांतर्गत ई-पीक पाहणी या स्वतंत्र प्लिकेशन निर्मिती केली आहे.त्यातच नोंदणीचे संकेतस्थळ सुरळीत चालत नसल्याने शेतकऱ्यांना अडचणी येत आहेत.

दि.१ ऑगस्टपासून ई -पीक पाहणी करण्याची सुरुवात झाली आहे. ई पीक पाहणीच्या माध्यमातून शेतकरी आपल्या पिकाची पाहणी स्वतः करू शकणार आहेत.खरीप पिक विमा साठी २०२४ च्या ई-पीक पाहणी करण्यासाठी मुदत दि.१५ सप्टेंबर पर्यंत देण्यात आली आहे.या कालावधीमध्ये शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचे योग्य पाहणी करून घेणे आवश्यक आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना विम्याची भरपाई मिळण्यासाठी मदत होणार आहे .

शेतकऱ्यांना १५ सप्टेंबरपर्यंत आपल्या पिकांची नोंद करण्याची मुदत देण्यात आली आहे.मात्र सध्या या पमध्ये अडथळे येत असून, नोंदणी होत नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.पमध्ये नावनोंदणीनंतर काही टप्पे पूर्ण होतात, मात्र संपूर्ण नोंदणीची प्रक्रिया मागील ३ ते ४ दिवसांपासून होत नसल्याचे शेतकऱ्यातून बोलले जात आहे डोंगरदऱ्यात शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना मात्र ई पीक पाहणी प रेंज नसल्यामुळे चालत नाही.अनेक शेतकरी अशिक्षित असल्यामुळे त्यांच्याकडे मोबाईल सुद्धा नाही.त्यांनी कशी पीक पाहणी करायची.असा सवालही अनेक शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

ई-पीक पाहणी नोंदणी करणे हे राज्य सरकारने बंधनकारक केले आहे.ई पीक पाहणी नोंदणी न केल्यास पीक विमा, शासकीय अनुदान, पंतप्रधान सन्मान निधी तसेच राज्य सरकारच्या नमो किसान योजनाचा लाभ मिळणार नाही,असे असल्याने शेतकरी ई-पीक पाहणी करण्यावर भर देत आहेत.

पेरणी करून २ महिने झाले असून,सतत पाऊस पडल्याने खरिपातील पिके धोक्यात आली आहेत. त्यातच ई- पीक पाहणी बंधनकारक करण्यात आली आहे.त्यामुळे ई- पीकपेरा करण्यासाठी शेतकरी प्राधान्य देत आहेत. मात्र, साइटवर वारंवार व्यत्यय येत असून, सर्व्हर काम करत नसल्याचे चित्र आहे.त्यामुळे तातडीने या अडथळ्यांकडे शासकीय यंत्रणेने लक्ष दिले तरच शेतकऱ्यांचे काम सुकर होऊ शकेल. पीकपेऱ्याची ई पीक नोंदणी करता येईल.

> ई-पीक पाहणी ॲंपमध्ये सध्या टेक्निकल अडचणीमुळे लोड होत,असले तरी सदर ॲंप एक ते दोन दिवसात चांगल्या रीतीने चालू होईल. पीकविमा आणि पीक नुकसानीचे अनुदान मिळण्यासाठी सर्व शेतकरी बांधव यांनी ई पीक पाहणी ॲंप द्वारे पिकाची नोंदणी करावी.खरीप हंगामातील पिकांची नोंद करण्याची अंतिम दि.१५ सप्टेंबर आहे.
>
> **-योगेश गोंड तलाठी सज्जा शेकापूर**

> ज्या शेतकऱ्यांकडे ॲंड्रॉइड मोबाइल आहेत, त्यांना नोंदणी करता येणार आहे.परंतु, ज्यांच्याकडे ॲंड्रॉइड मोबाइल नाही,अशा शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. ई-पीक पाहणी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यामुळे ई-पीकपेरा करण्यासाठी शेतकरी प्राधान्य देत आहेत. मात्र, साइटवर मागील ४ दिवसांपासून वारंवार व्यत्यय येत असून,सर्व्हर काम करत नसल्याचे चित्र आहे,याकडे तात्काळ शासनाने लक्ष देण्याची गरज आहे.
>
> **-राजेश बालाजी राठोड**
> **शेतकरी काशीराम तांडा**

# एक रक्षाबंधन असेही..



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली | प्रतिनिधी**

संत तुकाराम विद्यालय देहूच्या इयत्ता दहावी सन २००२ - २००३ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांकडून समाजाचं देणं हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येतो त्या अंतर्गत रक्षाबंधन सणानिमित्त श्री अहिल्यादेवी कन्या छात्रालय, देहू येथे राहणाऱ्या गरजू मुलींच्यासाठी किचनमध्ये अन्न शिजवण्यासाठी लागणाऱ्या लोखंडी भांड्यांचा सेट, व या मुलींना मासिकपाळीत वापरण्यासाठी वर्षभर पुरतील इतके सॅनिटरी नॅपकिन भेट देऊन रक्षाबंधन हा सण साजरा करण्यात आला.

किशोरी अवस्थेत मुलींच्या शरीरामध्ये ऍनिमिया हा लाल रक्तपेशींच्या कमतरतेचा आजार प्रामुख्याने आढळतो, ज्यावर किशोरवयातच योग्य उपचार मिळाले तर स्त्री निरोगी बनून भविष्यात तिचे मातृत्व सुरक्षित राहू शकते. या आजाराला प्रतिबंध करण्यासाठी लोखंडी भांड्यात अन्न शिजवून खाल्ल्यास रक्ताचे योग्य प्रमाण शरीरात राखले जाते. त्याचप्रमाणे या वयात मासिक पाळी देखिल सुरू होत असल्याने मासिक पाळीतील स्वच्छता तसेच योग्य काळजी घेतल्यास स्त्रीचे आरोग्य सुधारू शकते. भारतासारख्या पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांना पोषण विषयक नेहमी दुय्यमस्थान मिळते म्हणून रक्षाबंधन सारख्या सणाच्या निमित्ताने आपल्या भगिनींच्या या आरोग्य समस्यांचा जागर व्हावा तसेच त्याबद्दल जनजागृती निर्माण व्हावी त्यासाठी हा उपक्रम आयोजित केल्याचे यावेळी सांगण्यात आले. आपल्या घरातील स्त्री निरोगी राहिली तर संपूर्ण कुटुंब निरोगी राहू शकते परिणामी निरोगी राष्ट्र निर्माण होऊ शकते. त्यामुळे रक्षाबंधनसारख्या सणाला इतर गोष्टींची भेट देण्याऐवजी आपल्या बहिणीच्या आरोग्याला मदत करणारी भेट दिल्यास त्यातून एक चांगला संदेश जाऊ शकतो. यावेळी समाजाचं देणं हा उपक्रम राबविणारे रेहमान सय्यद, अनिल ताठे, महेश काळोखे, संतोष गळवे, गणेश झेंडे, तुषार विधाटे, ऍड. निलेश टिळेकर, राहुल ठाकूर, सुशांत गायकवाड, श्रीराम शिंदे, विशाल उंबरदंड, सोमनाथ बोत्रे, डॉ. अहेफाज मुलाणी आदी मान्यवर तथा अहिल्यादेवी छात्रालय संस्था प्रतिनिधी वंदनाताई धगाटे उपस्थित होत्या. यावेळी मुलींना डॉ. मुलाणी यांनी ऍनिमिया या आजारावर उपस्थित मुलींना मार्गदर्शन केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904